# प्रकरण – तिसरे

# बहिणाबाईच्या काव्यातील निसर्ग

## प्रकरण – तिसरे

# बहिणाबाईच्या काव्यातील निसर्ग

### प्रस्तावना

निसर्ग हाच बहिणाबाईच्या कवितेचा उद्गाता आहे. निसर्ग हा सर्वच कलावंताना आकर्षित करीत असतो. प्रत्येक कलावंत आपल्या व्यक्तिगत अनुभव पातळीवर त्याचे चित्रण करतो.

मानवी जीवनाचा अनुभव निसर्ग कल्पनेतून साकार करणारी रचना बहिणाबाईंनी केली. संपन्न निसर्ग, त्याचं ओसंडून वाहणारे सौंदर्य व त्यातून मिळणारा आनंद याचा प्रत्यय त्यांच्या कवितेत येतो. निसर्गात ओतप्रोत भरून राहिलेल्या चैतन्याचा आणि त्याच्या स्पर्शाने प्रत्येक वस्तूस लाभलेल्या आनंदमय व परिपूर्ण अशा अस्तित्वाचा साक्षात्कार त्यांच्या कवितेमधून होतो.

त्यांच्या निसर्गविषयक कवितांमधून पाऊस, धरती, आकाश, वारा, वृक्ष-वेली, झाडे-झुडपे इ. चा उल्लेख अगदी इतरांपेक्षा वेगळया स्वरूपात केलेला दिसतो. ''त्यांच्या कवितेने निव्वळ स्वप्नरंजन कधीच केले नाही. तर ती जीवनात जीवनतत्वे सांगण्यात यात आकंठ बुडाली. त्यांच्या कवितेतील निसर्ग उपयुक्तता आणि सौंदर्य मनात ठासवतो.''[१]

### दैनंदिन जीवनातील निसर्ग

बहिणाबाईची कविता म्हणजे दैनंदिन जीवन जगत असताना येणाऱ्या अनुभवाचे रेखाटन आहे. त्यांच्या दिवसाची सुरुवात वेगवेगळ्या कामांनी होत असे आणि हे कष्ट करता करता त्यांचे मन निसर्गात रमत असे. त्यांचे दैनंदिन जीवन निसर्गाशी समरस झाले होते.

त्यांनी आपले घर, कुटुंब सांभाळून अवतीभोवतीचा निसर्ग डोळसपणे पाहिला. त्यांचे जीवन आणि निसर्ग यामध्ये भिन्नता नव्हतीच. त्या निसर्गाशी पूर्णपणे एकरुप झाल्या होत्या. वयाच्या तिसाव्या वर्षीचं वैधव्य प्राप्त झाल्याने घर आणि शेती त्यानाच सांभाळावी लागली. शेतात राबत असताना त्यांना परमेश्वराच दर्शन उगवणाऱ्या पिकात झालं.

"माझ्यासाठी पांडुरंगा
तुझं गीता-भागवत
पावसात समावतं
माटीमधी उगवतं !"[२]

बहिणाबाईंनी रोजचे जीवन जगत असताना दिसणारी निसर्गाची वेगवेगळी रुपे आपल्यासमोर प्रकट केली आहेत. त्या म्हणतात, आपल्या हृदयात असलेल्या देवाचं रुप तो सूर्यबापा स्वत:च्या दर्शनाने आपल्याला घडवितो. त्याचप्रमाणे देवाच्या येण्याची चाहूल पानांमधून लागते व वाऱ्याचं येणं जाणं म्हणजे देवाचच येणं जाणं आहे असे त्यांना वाटते. त्यांच्या दैनंदिन जगण्यातून निसर्ग डोकावताना दिसतो.

बहिणाबाईंची कविता ही एका स्त्रीच्या भावविश्वातून साकार झालेली कविता आहे. स्त्रीच्या जीवनात माहेरचं स्थान अतिशय महत्त्वाचं आणि व्यापून राहिलेलं असतं. कारण त्या माहेरामध्येच ती लहानाची मोठी झालेली असते. तरीही ते माहेर, त्या ठिकाणची माणसे सोडून तिला एक दिवस तिच्या घरी जावं लागतं. सासरी आल्यानंतर माहेरच्या माणसांचा झालेला विरह, झालेले दु:ख कमी करण्यासाठी त्या माहेरच्या आठवणींचा आधार घेतात आणि यामधूनच बहिणाबाई आपल्या माहेरच्या वाटेवरील निसर्गाचे दर्शन घडवितात.

माहेरी जात असताना वाटेवरच्या लौकी नदीचे चित्र बहिणाबाईंनी रेखाटले आहे. त्या म्हणतात, 'चैत्र वैशाखाच ऊन म्हणजे अंगाची लाही लाही करणार ऊन. अशावेळी वाटेन जात असताना तुमचा पाय लौकी नदीमध्ये पडला तर तुमचा सगळा थकवा निघून जाईल'. या ठिकाणी त्यांनी नदीविषयी असलेले प्रेम व्यक्त केले आहे. 'माहेरच्या' वाटेवरच्या निसर्गातील प्रत्येक गोष्टीचे वर्णन त्या करतात. 'आसोद'च्या वाटेनं जात असताना त्या वाटेवर, नागवेलीच्या पानांचे तांडे लागलेले आहेत आणि त्या तांड्यामध्ये बारी पान कातरत असतो. बारीण ती पानं गोळा करीत असते. त्याचप्रमाणे लौकी नदी, वाटेच्या वाटसरुंची तहान भागवते असे त्या म्हणतात,

पुढे वाटेवर असलेले बाभळीचं बन, त्याच वाटेला असणारी पाण्याची डबकी, त्यामध्ये डुंबणाऱ्या म्हैशी, त्याचप्रमाणे रस्त्याच्या दोन्ही बाजूला असणारे ऊसाचे मळे इ. उल्लेख त्यांनी आपल्या कवितेमध्ये केला आहे. बहिणाबाई माहेरच्या आठवणी सांगताना म्हणतात, 'मला कधीतरी उचकी लागते आणि उचकी लागल्यानंतर मला एक साळुंखी दिसते. ती माझ्या माहेरी मी येणार असल्याचा निरोप पाठविते.' असा हा त्यांच्या माहेरच्या वाटेवरचा निसर्ग आपल्या मनावर एक वेगळा ठसा उमटवून जातो.

निसर्ग हा बहिणाबाईंच्या काव्याचा अविभाज्य घटक आहे: हा निसर्ग त्यांच्या सुखदु:खाशी निगडीत आहे. त्यामुळेच त्यांच्या कवितेत शेती, शेतकरी, शेतातील झाडे-झुडपे, नांगरणं, वखरणं, पेरणं, निंदण, कोळपणं, शेतकऱ्यांची वर्षभराची रोजची कामे इ. उल्लेख येतात.

## कृषीजीवनातून निसर्गाचे दर्शन

भारतासारख्या शेतीप्रधान देशातील ग्रामीण जीवन शेतीवर अवलंबून आहे. बहिणाबाईंच्या आसोद हया माहेरी व जळगावी सासरी दोन्ही ठिकाणी शेती हाच प्रमुख व्यवसाय होता. त्यामुळे शेती, शेतकरी, ग्रामीण जीवन, खेडयातली माणसं, तेथील निसर्ग, शेतकऱ्याचे शेतीवरील प्रेम त्यांच्या कवितेत आले आहे. त्यातूनच त्यांच्या कवितेमध्ये कृषीजीवनातून निसर्गाचे दर्शन घडते. त्या स्वत: शेतात राबल्यामुळे त्यांना आलेले अनुभव हे अस्सल आणि जिवंत आहेत. त्यांनी 'आला पाऊस' या कवितेमधून शेतकरी पाऊसाची किती आतुरतेने वाट पाहतो हे चित्र रेखाटले आहे.

मार्च-एप्रिल महिना उजाडतो. ऊनाचा तडाखा वाढलेला असतो. त्यामुळे जमिनीला भेगा पडलेल्या असतात. सर्वजण पावसाची प्रतिक्षा करत असतात. पाऊस नसल्यामुळे सगळीकडे कसे भकास आणि ओसाडं दिसत असते. आणि अचानक शेतकऱ्यास पाऊस आल्याची चाहूल होते. त्यांची धांदल सुरु होते. जमीन नांगरुन, जमिनीची मशागत करुन जमीन तयार केली जाते. आणि पहिल्या पाऊसास सुरुवात होते.

> ''आला पहयला पाऊस
> शिपडली भुई सारी
> धरत्रीचा परमय
> माझं मन गेल भरी''[३]

मृगाचा पहिला पाऊस आल्यानंतर काळी माती तृप्तीचा हुंकार टाकते. आणि शेतकऱ्यांची धांदल सुरु होते. मृग नक्षत्र संपायच्या आतच सारी पेरणी संपवायची असते. त्यासाठी शेतकरी 'पेरणी'ची पूर्वतयारी करुन ठेवतो. पाऊसाच्या येण्याचेही वर्णन

बहिणाबाईंनी कवितेमध्ये केले आहे. पाऊसाच्या सरीवर सरी येतात आणि सारं शिवार भिजून जाते. नदी-नाल्यांना पूर येतो. एकदा का पावसाने सुरुवात केली की तो थांबत नाही. धुमधडाक्याने पाऊस सुरु होतो. त्यामुळे घरे गळायला लागतात. ढगांचा गडगडाट सुरु होतो. पोरं घाबरुन घरात बसतात. पाऊस म्हणजे तरी काय ? तर देवा ते तुझ्या डोळ्यातील अश्रु आहेत. तुझ्या या बरसण्यामुळे चराचर सृष्टी नटून जाते. जणू सृष्टीचा आरासच होतो.

पेरणी झाल्यानंतर पाऊस मौन धरून बसतो. जे पेरलेले 'बी-बियाणे' आहे ते 'बी-बियाणे' धरणी माता आपल्या कुशीत सांभाळून ठेवते आणि गुरांच्या चाऱ्यासाठी आणि कोटी कोटी लोकांचे पोट भरण्यासाठी पीक तयार करते. पेरणी झाल्यानंतर शिवारामध्ये पीकं डोलू लागतात. त्यानंतर शेतकऱ्याला 'कापणी'चे वेध लागतात. ऊन सावल्यांचा खेळ सुरु होतो आणि 'कापणी' सुरु होते. पूर्ण शिवार कस पिवळ धम्मक झालेले असते. शिवारांमध्ये पिवळसर चकाकी दिसत असल्यामुळे सगळीकडे जणू सोनचं आहे असे वाटत आहे. तेव्हा बहिणाबाई सर्व शेतकऱ्यांना म्हणतात, आता कापणी आली आहे, तेव्हा हिंमत ठेवा आणि विळ्याना धार काढून ठेवा. सर्वांच्या शेतामध्ये 'पीक' मावेनासे झाले आहे. पिकाची थप्पीच्या थप्पी लागलेली आहे. कामाच्या व्यापामुळे सगळ्यांना थकवा आल्याने प्रत्येकाच्या डोळ्यावर झापड पडत आहे.

बहिणाबाईंच्या काव्यातील निसर्ग असाच क्रमाक्रमाने पुढे जात आहे. पेरणी झाली त्यानंतर कापणी झाली आणि त्यानंतर 'रगडनी' म्हणजे मळणी सुरु होते. त्या म्हणतात, पीकाचा साठा करुन सगळ्याच्या आधी शेत-शिवाराचं धन असलेल पीक जपून खळ्यामध्ये आणले जाते. 'खळं' मळणीसाठी सारवून-सुरवून तयार केले आहे. त्यांच्या मधोमध मेढ रोवली जाते. त्यामध्ये बैलाची पात सुरु होते. अशावेळी त्या म्हणतात, 'बैला आता लवकर चाल पायाखाली कणसाचा चुरा होऊ दे. त्यामुळे जे धान्य निघणार आहे त्याला त्या 'सोनं'

म्हणतात. बैला तू आता घाई कर त्यामुळे सोनं आमच्या घरी येणार आहे. रगडणी झाल्यानंतर 'उपनणी' येते आणि 'उपनणीसाठी वारा आवश्यक असतो. तो वारा आता वाया चालला आहे. तो माझ्या 'उपनणी' करण्याच्या वेळी असेल असे नाही. त्यामुळे मी त्याला धरुन ठेवू शकत नाही. त्यामुळेच त्या बैलांना भरभर चालण्याविषयी सांगतात आणि 'वारा' जोपर्यंत आहे तोपर्यंतच सर्वांनी आळस झटकून कामाला लागा असे त्या सुचवितात.

'निसर्ग' बहिणाबाईंशी संवाद साधतो हे आपल्याला पुढील काव्यपंक्तीवरून दिसून येते.

> "मिनमिन आला वारा
> कोन कोनाशी बोलली
> मन माझं हरखलं
> पानं झाडाची हालली"[४]

झाडाची पानं हालली तेंव्हा त्या म्हणतात की माझ मन आनंदून गेल. कारण पानं एकमेकांशी सांगत होती की आता वारा येणार आहे, हे त्यांच्या हालचालीवरून स्पष्ट होते. आपल्याला त्यांच्या बोलण्याची भाषा अशी ही निसर्गाचीच भासते. यावरूनच आपल्या लक्षात येते की त्या निसर्गाशी किती एकरुप होत्या. वारा जोरात आला की प्रथम झाड-झुडपं डोलतात. त्यावरून वाऱ्याचा वेग लक्षात येतो. आता उपननीसाठी तयार रहा असे त्या सांगतात. अशा प्रकारे पेरणी, कापणी, मळणी, उपननी झाल्यानंतर व सर्व धान्य घरी आल्यावर शेतकरी जरा स्वस्थ होतात.

बहिणाबाईंचे कृषीजीवनांशी असलेले नाते अजोड आहे. त्यांनी कृषीजीवनातून जे निसर्ग चित्र रेखाटले आहे ते त्यांनी स्वत: अनुभवले आहे. त्यांनी नांगरणीपासून कापणी, रगडनी, उपननी अशी कित्येक प्रकारची कामे केली होती. त्यांच्या कृषीजीवनाशी संबंधित कवितेमधून या सर्व गोष्टींसह ऊन, वारा, धरती, आकाश, शेतामधील पिके या सर्व गोष्टीचा उल्लेख येतो.

**निसर्गामधून अध्यात्माचे दर्शन**

बहिणाबाईंचं तत्त्वज्ञान अगाध आहे त्यांनी आपल्या कवितांमधून निसर्गातील अनेक चमत्कारांचे रेखाटन कौशल्याने केले आहे. 'देव अजब गारोडी' या कवितेत बीज जमिनीत रूजल्यापासून ते त्याच रोप होऊन त्याला धान्य येईर्यंतच्या अवस्थेचं वर्णन त्यांनी खूपच मार्मिक केलं आहे.

> ''धरत्रीच्या कुशीमधी
> बीयबियानं निजली
> वऱ्हे पसरली माटी
> जशी शाल पांघरली. ''[५]

मातीची शाल पांघरून 'बी-बियाणे' जमिनीमधे झोपून जातात. हे बीज जमिनीत रूजते आणि त्याला कोंब येतात. त्या कोंबाना बहिणाबाईनी सुरेख उपमा दिली आहे. जसे थंडगार वारा अंगाला झोंबून गेल्यानंतर अंगावर शहारे उठतात. त्याचप्रमाणे हे कोंब वरती आल्यानंतर सारं शिवार शहारून जाते. उन वाऱ्याशी खेळत खेळत या कोंबाचं पानात रूपांतर होते. या ठिकाणी त्या कोंबाना वाढण्यासाठी सूर्यप्रकाश आणि हवा याची गरज असते हे वास्तवही सांगून जातात. ''या कोंबातून दोन दोन पाने प्रगट होतात. 'पर्गटली दोन पानं'

इथ ईश्वराचं दर्शन त्यांना घडावयाचे आहे. 'प्रकटणे' अचानक असते.''[६] त्याचप्रमाणे एका कोंबातून दोन पाने प्रकट होणे हे देखील परमेश्वराचा चमत्कारच आहे. सुरूवातीला रोपाला दोनच पानं येतात. ही पानं एकमेकांना जोडलेली असतात. पण नंतर वाऱ्याने ती पानं एकमेकांपासून वेगळी होतात. जणू ती आपले दोन हात एकमेकांवर आपटून टाळया वाजवीत आहेत. देवांचे भजन करण्यात मग्न आहेत. भजन करून ती जणू प्रार्थना करीत आहेत की सर्वत्र आबादीआबाद होऊ दे.

दिवसागणीक या रोपांची वाढ होते. रोपं मोठी होतात, पिकाला बहर येतो त्यामुळे शिवारांमधे पिकाची दाटी होते. त्यानंतरची भूमिका स्पष्ट करताना त्या म्हणतात.

'' कसे वाऱ्यानं डोलती
दाने अले गाडी गाडी
दैव गेलं रे उघडी
देव अजब गारोडी''[७]

बहिणाबाई अशाप्रकारे निसर्गातील चमत्कारांचे वर्णन करतात. ज्यावेळी आपण पेरणी करतो त्यावेळी एक-एक बी जमिनीत पेरतो. पीक परिपूर्ण तयार झाल्यानंतर त्या कणसाला कितीतरी दाणे असतात. म्हणूनच त्या म्हणतात देव हा अजब गारोडी आहे. कारण 'गारोडी' जसा माणसांना आश्चर्यचकीत करणाऱ्या वस्तू आपल्या पोतडीतून काढत असतो. त्याचप्रमाणे देव हा निसर्गातील पोतडीतून अजब अजब चमत्कार दाखवीत असतो. त्यांची कविता माणसांत व निसर्गात रमणारी आहे. देवांच्या अस्तित्वाविषयी फार पूर्वीपासून वाद आहेत. प्रत्येक विद्वानांचे तत्वज्ञान वेगवेगळे असल्यामुळे त्यांच्यामधेच ताळमेळ नाही. परंतु बहिणाबाईनी देव कुठे? यांचे उत्तर किती साधं आणि सोप्या पध्दतीनं सांगितल आहे.

देव कुठे? तर त्या म्हणतात, 'आभायाच्या आरपार'. ही सृष्टीचं माझी गीता आहे ही सृष्टीचं माझं भागवत आहे. त्यामुळे देवाला पाहणं माझ्यासाठी मुळीच कठीण नाही. कारण

"तुझ्या पायाची चाहूल
लागे पानांपानामधी
देवा तुझं येन जानं
वारा सांगे कानामधी "[८]

देवा या चराचर विश्वात तू सामावलेला आहेस, सृष्टीतल्या प्रत्येक गोष्टीत तुझा वास आहे. त्यामुळेच निसर्गातील प्रत्येक गोष्टीत तुझे रूप पाहवयास मिळते. देवा, तुला बघण्याची जर इच्छा झाली तर सभोवताली असणाऱ्या निसर्गाकडे पाहिल्यानंतर तुझे दर्शन आपोआपच घडते. आणि तू येणार असल्याची चाहूल आजूबाजूला असणाऱ्या झाडाझुडपाच्या हालचालीवरून कळते.

बहिणाबाईंना निसर्गात दिव्य-अलौकिक सौंदर्याचा साक्षात्कार झाला होता. मानवी जीवनाचा अनुभव निसर्ग कल्पनेतून साकार करणारी रचना त्यांनी केली. मानवी मन आणि निसर्ग यांचा समतोल साधून त्यांनी मानवाला उपदेश केले. निसर्गाच्या आधाराने मानवी जीवन फुलत राहते. त्यामध्ये बऱ्याच वेगवेगळया भावना असल्या तरीही जीवनानुभव म्हणून त्यांना विशेष महत्व प्राप्त होते.

### वृक्ष वल्लरींशी मैत्री

'वृक्ष–वल्ली आम्हां सोयरे वनचरे !' असे तुकाराम महाराजांनी म्हटले आहे. त्याचप्रमाणे बहिणाबाईंच्या काव्यामधेही वृक्ष-वेलींशी असलेली जवळीकता दिसून येते. त्यांनी निसर्गातील घटकांशी लावलेला लळा त्यांच्या सुख-दु:खाशी त्याने केलेली सोयरीक,

आपल्याल्या पाहवयास मिळते. शेता-शिवारातील झाडाशी वृक्ष वेलीशी त्यांची फार मैत्री होती. 'बहिणाईची गाणी' (आवृत्ती चौथी) निसर्गकन्या-बहिणाई-माझी आई यामध्ये लिहताना सोपानदेव चौधरी म्हणतात, "माझ्या आईला वृक्ष फार आवडत असतं तिनं. आपल्या आवडणाऱ्या वृक्षांना नावे ठेवली होती. आमच्या विहिरीच्या धावेवर गुलमोहरांचा वृक्ष होता त्याला ती म्हणत असे 'फुलाजीबोवा' आणि 'फुलाजीमहाराज' अशीच एक आठवण सांगताना ते म्हणतात, 'आईच्या या फुलाजी महाराजची सावली विहीरीच्या दुसऱ्या बाजूला असलेल्या माझ्या चुलत भावाच्या वाटणीत पडत असे. तो एकदा संतापाने म्हणाला, हे झाड तोडून टाका ! तेव्हा आई त्याला म्हणाली पाठीमागे आंब्याचे झाड आहे ते सामाईक आहे व त्याची सावली आमच्या शेतात पडते तेव्हा ते पण तोडून टाकायचे का ?' त्यानंतर बहिणाबाईच त्याचे स्पष्टीकरण करताना म्हणतात, अरे, आंबे खाऊन पोट भरते, पण या फुलाजी महाराजाकडे पाहिल्यानंतर मन भरून जातं."[१] खरोखर बहिणाबाईच्या बोलण्यात किती तथ्य होते आपल्याला दिसते. आज जरी आपण रस्त्यानी असताना आपल्याला एखादे फुललेले गुलमोहराचे झाड पाहिले की आपले मन कसे प्रफुल्लित होतं. एक प्रकारचा आल्हाद आपल्या मनाला मिळतो.

निसर्ग हा चराचर गोष्टीमध्ये सामावलेला आहे. बहिणाबाईचा निसर्गाकडे पाहण्याचा निरागस, उत्स्फूर्त दृष्टीकोन त्यांच्या कवितेतून दिसून येतो. खरोखर निसर्ग सौंदर्यातून मिळणारा अनुभव हा आगळा वेगळा आनंद असतो. रोजच्या दैनंदिन व्यवहारात जे अनुभव आले ते बहिणाबाईंनी निसर्गाच्या माध्यमातून व्यक्त केले आहेत. त्याचं जीवन आणि निसर्ग हे भिन्न नाहीतच. त्या निसर्गाशी एकरूप झाल्या. त्यांनी कवितेप्रमाणेच काही स्फुट ओव्याचीही रचना केली. त्यामधेही निसर्ग डोकावताना दिसतो.

''कडू बोलता बोलता

पुढे कशी नरमली

कडू निंबोयी शेवटी

पिकीसनी गोड झाली.''[१०]

कडू निंबोयी ही कच्ची असल्यानंतर कडवट असते पण नंतर पिकल्यानंतर गोड होते. त्याचप्रमाणे या ठिकाणी मानवी भावभावनावर बहिणाबाईनी प्रकाश टाकला आहे. एखादी स्त्री सुरूवातीला सर्वांशी तुसडेपणाने वागणारी अगदी कडवट बोलणारी नंतर आपला तोरा विसरून सर्वांशी गोड बोलू लागते. त्यांनी समाजातील लोकांच्या अहंकारावर, स्वार्थीपणावर बोट ठेवून अत्यंत मार्मिक शब्दात त्यांचे रेखाटन केले आहे. त्याचं मन नेहमी निसर्गात रमत असे. त्या निसर्गाचे अतिशय सूक्ष्म असे निरीक्षण करीत असत. त्यामधूनच त्यांना वेगवेगळे विचार यायचे. बाभळीचे पान आणि केळीचे पान यांच्या संवादातून त्यांनी माणसांची प्रवृत्ती, त्यांची वागण्याची पध्दती याचा अचूक वेध घेतला आहे. त्यांनी समाजातील वस्तुस्थितीवर निसर्गाच्या प्रतिमा वापरून प्रकाश टाकला आहे.

''फाट आता टराटर

नही दया तुफानाले

हाले बाभयीचं पान

बोले केयीच्या पानाले.''[११]

कितीही मोठे वादळ आले तरी बाभळीच्या पानांवर त्यांचा काहीही परिणाम होत नाही. परंतु केळीची पान मात्र वादळाने फाटतात. तसेच दुसऱ्या अर्थाने असंही म्हणता येईल की, '' शेतात केळीचे आणि बाभळीच झाड शेजारी शेजारी असल्यानं वादळ येताच बाभळीच्या काटयानी केळीची पानं फाटतात. पण बाभळीच्या पानांनी हा सारा दोष वादळाचा

असल्याच दर्शविल आहे. आणि वादळाला कुणाचीही दया येत नसल्याच सांगून आता केळीच्या पानाला फाटण्यावाचून गत्यंतर नाही असा इशारा दिला आहे."[१२] माणसे आपण स्वत: कसे आहोत हे न पाहता दुसऱ्यांना हिणवतात, हेच बहिणाबाईनी निसर्गातील रूपकांच्या माध्यमातून सांगितले आहे. निसर्गाचे आगळेवेगळे रूप आपल्यासमोर मांडले आहे. त्यांची कल्पनाशक्ती अद्‌भूत होती. त्यांनी निसर्गातील प्रत्येक घटनेकडे मानवी प्रवृत्ती म्हणून पाहिले आहे.

"उच्च्या खुज्या जोडप्याची
कशी जमली रे जोड
उगे ताडाखाले जसं
भुईरिंगनीचं झाड ![१३]"

एखाद्या उंच माणसाची बायको जर अगदीच ठेंगणी असेल तर त्याला विजोड जोडपं म्हटल जातं. अशाच एखाद्या विजोड जोडप्यावरून त्यांनी वरील ओवी रचली असावी. त्यांनी एकाला उंच उंच ताडाच्या वृक्षाची उपमा दिली आहे. तर दुसऱ्याला भुईरिंगनीच्या झाडाची. एक खूप उंच तर दुसरं मात्र जमिनी लगतं असणारं.

बहिणाबाईंना वृक्षाचे विलक्षण वेड त्यांना वृक्षासोबत संवाद साधायला खूप आवडत असे. निसर्गाशी तर त्यांचे सख्खे नाते होते. आठवणीतील एक प्रसंग सांगताना सोपानदेव चौधरी म्हणतात. "मी आईबरोबर आजोळी पायीच जात असे. असेच जात असताना रस्त्याच्या बाजूला एक शेवरीचे झाड उगवलेले दिसले. कमरेइतकी त्याची उंची होती. आई त्या शेवरीजवळ गेली आणि तिच्याशी काय बोलली कुणास ठाऊक ! यानंतर एकदोन वर्षांनी आईबरोबर मी आजोळी जायला निघालो. जाताना मध्येच ती थबकली आणि

त्या शेवरीजवळ जाऊन मोठ्यांदा म्हणाली, "केवढी मोठ्ठी झाली व तू ! एखाद्या उपवर मुलीकडे बघून बोलावे असेच ती बोलली."[१४] त्या वृक्षाशी, वेलीशी आपलेपणाने संवाद साधीत त्यांच्या जाम मळ्यातील 'खिरणीच्या' वृक्षाला 'दुभती' म्हणून संबोधित असतं. असं त्याचं निसर्गाशी आगळवेगळं नातं होतं.

व्यक्तीला दैनंदिन कामाच्या व्यापातून, ताणामधून एखादा क्षण जरी फुरसतीचा मिळाला तर तो सहजपणे बाहेर डोकावतो. अशावेळी त्याला साधे निसर्गदृश्यही सुखावून जाते. निसर्गाबद्दलचे प्रेम हा त्याचा स्वाभाविक गुण आहे. बहिणाबाईंनाही निसर्गाचे वेड होतेच. त्यांच्या मनात सतत निसर्गाशी सुखसंवाद सुरू असे. सहज जाता जाता एखादा वृक्ष, वेली दिसली की त्यांच्या मुखातून आपोआप शब्द बाहेर पडतं.

"हिरवे हिरवे पानं
लाल फयं जशी चोच
आलं वडाच्या झाडाले
जसं पीक पोपटाच !"[१५]

या ओवीमधील वर्णन वाचत असताना आपल्याही डोळ्यासमोर वडाचा वृक्ष उभा राहतो. हिरव्या हिरव्या गार पानांनी बहरलेला वडाचा वृक्ष त्याची लाल लाल फळ एखाद्या हिरव्या रंगाच्या पोपटाची लाल लाल चोच. वडाच्या झाडाचीही हिरवी हिरवी पानं आणि पोपटाच्या चोचीसारखी लाल लाल फळं पाहून त्यांना असे वाटते की जणू काही वडाच्या झाडाला पोपटाचं पीक आलं आहे. त्यांनी निसर्गातील घडणाऱ्या घटनांचे वर्णन किती मोजक्या शब्दात आणि प्रत्ययकारी केले आहे. वडाच्या झाडाप्रमाणेच त्यांनी पळसाच्या झाडाचेही वर्णन केले आहे. वडाचा वृक्ष पाहिल्यानंतर वडाच्या झाडावर जणू पोपटाचं पीक

आल्यासारखं वाटतं असं त्यांनी म्हटले आहे. तर पळसाचे झाड पाहिल्यानंतर त्यांना वाटते, वडाच्या वृक्षावर जे हिरवे पोपट होते ते पळसाच्या झाडावर बसल्यानंतर आपल्या लाल चोची तिथेच विसरून उडून गेले. बहिणाबाईंची कल्पनाशक्ती अचाट होती. याचा या ठिकाणी पुन्हा एकदा प्रत्यय येतो. चैत्र, वैशाखाच्या महिन्यात पळसाची पाने गळून गेलेली असतात. त्यामुळे त्यावरती फक्त लाल लाल फुलेचं असतात. त्यांनी निसर्गातील विविध रंग टिपून घेतले. या ठिकाणी पानचा हिरवा रंग जणू पोपटांचा आहे असेच दर्शविले आहे. त्यांनी जो निसर्ग पाहिला, अनुभवला त्याचे सूक्ष्मपणे निरिक्षण केले आणि तेच त्यांनी कवितेत रेखाटले. जमिनीवरील हिरवळ, आकाशातील निळा रंग यांची उत्कृष्ट रंग-संगती बहिणाबाईंनी चित्रित केली आहे.

''धर्तीवरली हिवय
गेली उडत उडत
अरे उडता उडता
झाली नियी आभायात''[१६]

निसर्गातील रंग-संगतीचा चमत्कारच त्यांनी अशा प्रकारे रेखाटला आहे. त्या म्हणतात, 'जमिनीवरची हिरवळ उडत उडत वर गेली आणि चमत्कार असा की ती हिरवळ वर उडता उडता आभाळात पोहचेपर्यंत निळी होऊन गेली.' त्यांच्या कविमनाची ही झेप विस्मयचकीत करणारी आहे. त्यांची कल्पनाशक्ती किती अचाट आहे याची येथे प्रचिती येते.

मानवापुढे निसर्ग आपल्या सौंदर्याचे भांडार उघडून बसलेला आहे. परंतु निसर्गातील दृश्ये अनुभवण्यासाठी मनुष्याला आपल्या कामातून वेळ मिळत नाही. यंत्रयुगामुळे मानवाचे जीवन धावपळीचे झाले आहे. त्यामुळे मानवाला आज निसर्ग सान्निध्याची गरज भासते

त्याला त्यातून आनंद मिळतो. आपल्या कवितेमध्ये बहिणाबाईंनी निसर्गाचे विविध दर्शन खूप सुंदरतेने घडविले आहे. त्यांच्या काव्यामध्ये निसर्ग आहे आणि निसर्गामध्येही त्यांचे काव्य आहे असेच म्हणावे लागेल.

बहिणाबाईंची कविता स्वानुभवावर उभी आहे. त्या जे जीवन जगल्या तेच काव्यरुपातून प्रकट झाले. घरातील कामे, शेतातील कामे हेच त्यांच्या जीवनाचे सूत्र होते. त्या ज्या समाजात राहतं होत्या तो समाज ग्रामीण होता. शेती हाच त्यांचा प्रमुख व्यवसाय होता. त्यामुळेच त्यांच्या निसर्गकाव्यामध्ये ग्रामीण जीवनानुभव येतात. त्यांच्या कविता या त्यांना आलेल्या अनुभवावर रचलेल्या आहेत. शेतातील कामे करताना त्या निसर्गाच्या अगदी समीप जातं. त्यामुळे त्यांना निसर्गाशी संवाद साधणे सोपे जात असे. कापूस वेचणीच्या वेळी आलेला अनुभव त्यांनी आपल्या शब्दांत व्यक्त केला आहे.

> ''उठा उठा बहिनाई
> बोडं कपाशीचे येचा
> बोटं हालवा हालवा
> जशा पाखराच्या चोचा''[१७]

कापूस वेचणीच्या दिवसात कापूस बोंडापासून काढून गोळा करण्यासाठी मजूरांची आवश्यकता भासे. काम सुरू असताना, बोंडाबोंडातून कापूस काढताना त्या मजुरांवर लक्ष ठेवण्यासाठी घरमालकाचीही आवश्यकता असे. तेंव्हा बोंडाबोंडातून कापूस काढत असताना बोटांच्या हालचाली होतं त्याला बहिणाबाईंनी पाखराच्या चोचीची उपमा दिली आहे.

बहिणाबाईंनी निसर्गातील प्रत्येक घटकांशी आपलेपणाने संवाद साधला. त्यांनी रेखाटलेल्या निसर्ग-चित्रामध्ये कुठेच कृत्रिमता नाही. कुटुंबातील सदस्य ज्याप्रमाणे

एकमेकांची विचारपूस करतात त्याचप्रमाणे बहिणाबाई आपल्या कुटुंबामधील सदस्यांप्रमाणे निसर्गाची आपुलकीने विचारपूस करतात. एखाद्या घड आलेल्या केळीला त्या 'कशी माझी लेकुरवाळी रंभा' असे म्हणत असतं.

त्यांना वृक्षाविषयी, झाडाविषयी विलक्षण जिव्हाळा होता. त्याचप्रमाणे त्यांचे काळ्या धरतीवरही खूप प्रेम होत. म्हणूनच त्या म्हणतात, 'या काळ्या धरतीवर जेव्हा घाम पडेल, तो त्या जमिनीत जिरेल तेव्हाच त्या जमिनीतून हिरवं शेत उगवेल आणि हिरव्यामधून पिवळं सोनं मिळेल. धरतीमध्ये बहिणाबाईंचा जीव असा गुंतलेला आहे.' त्यांना शिवारातील पिकांचेही वेड होते. त्यामुळेच काळा, हिरवा, पिवळा अशी रंगसंगती साकारुन त्या कविता रचतात. त्यांच्या निसर्गप्रतिमा खरोखरच अवर्णनीय आहेत. त्या एखाद्या व्यक्तीच्या वैशिष्ट्याबद्दलही लिहिताना निसर्गातील उपमा देतात. त्यांची नणंद कासाई किती सुंदर आहे हे सांगण्यासाठी त्यांनी चमेलीच्या फुलांची उपमा दिली आहे.

''हिचं सरील नाजुक
चंबेलीच्या फुलावानी''[१८]

बहिणाबाईंना वृक्ष वेलीचे फारच आकर्षण होते. त्यांनी निसर्गातील चित्रे अलगद टिपली आहेत आणि ते सारं शब्दांतून उतरविले आहे. ''उपयुक्तता आणि सौंदर्य यात उपयुक्तता सौंदर्यावर मात करते. निव्वळ सौंदर्यवादाने बहिणाबाई कधीच वेडावून गेल्या नाहीत.''[१९] त्यांच्या निसर्ग कवितांमध्ये सौंदर्य तर आहेच पण त्याच्या बरोबर मानवी जीवनांसाठी उपयोगी असणारे तत्त्वज्ञान व उपदेशही आहेत. त्यांच्या निसर्गविषयाच्या कल्पना, उपमा एखाद्या पंडितालाही लाजवतील अशा आहेत.

## समारोप

आधुनिक मराठी कवितेतील 'निसर्ग' या गोष्टीचा विचार करत असताना आपल्या डोळ्यासमोर केशवसुत, बालकवी, त्यांच्या कविता, त्यामधून डोकावणारा निसर्ग आपल्याला दिसतो. त्याचप्रमाणे त्यांनी योजलेल्या निसर्ग प्रतिमा आपण पाहतो. परंतु बहिणाबाईंचे काव्य हे केशवसुत, बालकवी इ. यापेक्षा कितीतरी पूर्वीचे काव्य आहे. तरीसुद्धा त्यांच्या काव्यातील उपमा एखाद्या नवकवीला लाजवतील अशाच आहेत. त्यांच्या कवितेमध्ये निसर्गाचे चित्रण बऱ्याच ठिकाणी आढळते. त्या स्वत:च शेतकरी असल्यामुळे साहजिकचं निसर्गाशी संबंध आला. अशिक्षित असलेल्या या स्त्रीची कल्पनाशक्ती आणि निरिक्षणशक्ती अद्‌भूत होती. म्हणतात की, ''साहित्यात संस्कारशील आणि अनुभवसंपन्न मनाचा अविष्कार होत असतो.''[२०] त्याप्रमाणेच त्यांचे काव्य हे अनुभवातूनच जन्माला आले आहे.

'निसर्ग' हा त्यांच्या काव्याचा एक अविभाज्य घटक आहे. तो निसर्ग त्यांच्या जीवनाशी एकरुप झाला आहे. त्यांच्या सुखदु:खाशी निगडीत आहे. त्यांच्या निसर्गविषयक कवितेमध्ये, लौकी नदी, पाऊस, वारा, ऊन, शेतकरी, शिवारं, पिके, वृक्ष, वेली, बैल इ. चा उल्लेख आला आहे. त्यांच्या निसर्गविषयक कवितामधून बहिणाबाई आपल्याला जीवनाविषयीचे तत्त्वज्ञान सांगतात. त्यामुळेच हा निसर्ग त्यांच्या काव्यात ठायी-ठायी डोकावतांना दिसतो.

------

## प्रकरण तिसरे

## संदर्भ


१. आशालता कांबळे, बहिणाबाईंची कविता : एक आकलन, अश्वमेध प्रकाशन, प्रथमावृत्ती, २०००, पृष्ठ क्र.२७.

२. चौधरी बहिणाबाई, बहिणाईची गाणी, ज्योती पिरिऑडिकल्स प्रकाशन, आवृत्ती चौथी, १९८२, पृष्ठ क्र. ३.

३. तत्रैव, पृष्ठ क्र. ३०.

४. तत्रैव, पृष्ठ क्र. ४०.

५. तत्रैव, पृष्ठ क्र. ३५.

६. स.ग. यादव, निसर्गकन्या, बहिणाबाई चौधरी, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर आवृत्ती पहिली १९८२, पृष्ठ क्र. ३२.

७. चौधरी बहिणाबाई, बहिणाबाईची गाणी, ज्योती पिरिऑडिकल्स प्रकाशन, आवृत्ती चौथी, १९८२, पृष्ठ क्र. ३४.

८. तत्रैव, पृष्ठ क्र. ३.

९. तत्रैव, निसर्गकन्या बहिणाई - माझी आई, प्रस्तावना सोपानदेव चौधरी, पृष्ठ क्र, ८.

१०. तत्रैव, पृष्ठ क्र. १०१.

११. तत्रैव, पृष्ठ क्र. १०१.

१२. प्रमिला भिरुड, बहिणाअीची गाणी-एक अभ्यास, व्यंकटेश प्रकाशन जळगांव, प्रथमावृत्ती, आगस्ट, २०००, पृष्ठ क्र.१०१.

१३. चौधरी बहिणाबाई, बहिणाबाईची गाणी, ज्योती पिरिऑडिकल्स प्रकाशन, आवृत्ती चौथी, १९८३, पृष्ठ क्र. १०१.

१४. तत्रैव, निसर्गकन्या बहिणाई-माझी आई, प्रस्तावना सोपानदेव चौधरी, पृष्ठ क्र.२०,२१.

१५. तत्रैव, पृष्ठ क्र. १०१.

१६. तत्रैव, पृष्ठ क्र. १०७.

१७. तत्रैव, पृष्ठ क्र. १०७.

१८. तत्रैव, पृष्ठ क्र. १११.

१९. आशालता कांबळे, बहिणाईंची कविता : एक आकलन, अश्वमेध प्रकाशन, प्रथमावृत्ती, २०००, पृष्ठ क्र.२७.

२०. स.ग. यादव, निसर्गकन्या-बहिणाबाई चौधरी, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, आवृत्ती पहिली, १९८२, पृष्ठ क्र.११३.